रयत शिक्षण संस्थेचे

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर

मराठी विभाग २०२१-२०२२

# सूचना

दि.१९/०५/२०२२

महाविद्यालयातील मराठी विभागातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की शनिवार दिनांक २१ मे २०२२ रोजी सकाळी १०:०० वाजता मराठी विभागांतर्गत शा.कृ.पंत वालावलकर स्कूल मुक्तसैनिक येथील ग्रंथालयास भेट देण्यात येणार आहे.तरी सर्व विद्यार्थ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे.

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE ★ KOLHAPUR

**प्रा. डॉ. सिंधू जयवंत आवळे**

**मराठी, विभाग प्रमुख**

रयत शिक्षण संस्थेचे,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.
मराठी विभाग २०२१-२२

दि.२१ /०५/२०२२

## मराठी विभागाच्या वतीने वालावलकर प्रशालेच्या ग्रंथालयास भेट

## अहवाल

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये मराठी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम घेण्यात आले आहेत. याचाच एक भाग म्हणून दि.२१ मे रोजी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त मराठी विभागाच्या वतीने येथील शा.कृ.पंत वालावलकर या प्रशालेच्या ग्रंथालयास भेट दिली. याभेटीमध्ये मराठी विभागातील विद्यार्थी, प्राध्यापक सहभागी झाले होते. या अभ्यास भेटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध ग्रंथांची व लेखकांची ओळख झाली तसेच वालावलकर प्रशालेचे सुसज्ज ग्रंथालय पहावयास मिळाले. यावेळी विद्यार्थ्यांनी अशा प्रकारचे सुसज्ज ग्रंथालय पाहून ज्ञानात भर पडल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी वालावलकर प्रशालेच्या ग्रंथपाल सौ.मृदुला शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यातून त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाच्या कामकाजाविषयी माहीती समजावून सांगितली. तसेच ग्रंथालयातील महत्त्वपूर्ण ग्रंथांची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. यावेळी मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.सिंधू आवळे यांनी महाविद्यालयाच्या वतीने वालावलकर प्रशालेचे व ग्रंथपाल सौ.मृदुला शिंदे यांचे आभार व्यक्त केले. याप्रसंगी मराठी विभागातील प्रा.अंकुश घुले, डॉ.महेश रणदिवे, प्रा.विनोद आखाडे, आदी प्राध्यापक तर अमर मारुती कांबळे, तुषार भरमा मागाडे, महेश अशोक लोखंडे, तानाजी राठोड आदी विध्यार्थी उपस्थित होते. या अभ्यास भेटीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.व्ही.व्ही.किल्लेदार यांनी मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले.

**प्रा. डॉ. सिंधू जयवंत आवळे**
**मराठी, विभाग प्रमुख**

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE ★ KOLHAPUR